सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,शिंदखेडा जि.धुळे
शिंदखेडा तालुका देखरेख संघ लि.शिंदखेडा यांचे कार्यालयाचे इमारतीत,स्टेशन रोड,शिंदखेडा जि.धुळे

---

जा.क्र.वि-२/देगांव/कलम७७ अ/सन२०१७ दिनांक २२/०५/२०१७

वाचावे:-१.महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (सुधारणा २०१३) चे कलम ७७-अ(१-अ)(ब)
२.महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीचे निवडणुक) नियम २०१४ मधील तरतुदी
३.मा.राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडील आदेश
जा.क्र.५५०/रासनिप्रा/तालुकाप्रभाग/आदेश/सन२०१४,दिनांक १०/१०/२०१४

---

ज्याअर्थी देगांव विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या.देगांव ता.शिंदखेडा जि.धुळे ही संस्था या कार्यालयाने नोंदणी केलेली नोंदणीकृत सहकारी संस्था असून सदर सस्थंचे निबंधक; हे कार्यालय आहे. यापुढे सदर संस्थेचा संस्था असा नामोल्लेखीत करण्यात येत आहे.

ज्याअर्थी वाचावे क्र.२ मधील भाग क्र.२ चा ४ (III) मध्ये सदर संस्था निवडणुकीच्या क वर्गात समाविष्ट होते.आणि, क वर्गातील सहकारी संस्थांचे निवडणुकीची कार्यवाही करण्याचे अधिकार संदर्भ क्र.२ नुसार मा.तालुका सहकार निवडणुक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,शिंदखेडा यांना आहेत.

ज्याअर्थी संस्थेने सादर केलेला नमुना ई-२ नुसार आपली संस्था दिनांक 8/5/2018 मध्ये निवडणुकीस पात्र असल्याचे दिसून येते.आणि, संस्थेने अद्यापपावेतो मतदार यादी या कार्यालयास सादर केलेली नाही.

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीचे निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ९ (३) मध्ये स्पष्ट तरतुद आहे की, मतदारांच्या अधिप्रमाणित तात्पुरत्या छापील यादीच्या चार प्रती त्याचप्रमाणे शक्यातो डिजिटल नमुन्यात संस्थेच्या समितीने तालुका सहकारी निवडणुक अधिकारी यांनी निर्देश दिल्याप्रमाणे समितीची मुदत समाप्त होण्यापुर्वी एकशेवीस दिवस अगोदर द्यावयाची आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-अ (१-अ) (ब) मध्ये तरतुद आहे की संस्थेच्या व्यवस्थापन समितीने संस्थेच्या समितीचा कालावधी पुर्ण होण्यापुर्वी निवडणुकीची कार्यवाही करून नवीन समिती अस्तित्वात येण्याची अंमलबजावणी करील व तसे करण्यात संस्थेने कसूर केला आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीचे निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ९ (३) मधील तरतुदीनुसार संस्थेने समितीची मुदत समाप्त होण्यापुर्वी एकशेवीस दिवस अगोदर मतदार यादी (नमुना ई-३) देणे बंधनकारक होते तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-अ (१-अ) (ब) मध्ये तरतुद आहे की संस्थेचे व्यवस्थापन समितीने संस्थेच्या समितीची कालावधी पुर्ण होण्यापुर्वी निवडणुकीची कार्यवाही करून नवीन समिती अस्तित्वात येण्याची अंमलबजावणी करील अशी तरतुद असून त्यात आपण कसूर केला आहे. असे या कार्यालयाचे मत आहे.

त्याअर्थी मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

मी, प्रदीप बागुल, सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,शिंदखेडा, मला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ नुसार प्राप्त झालेल्या विधीशक्तीनुसार देगांव विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या.देगांव ता.शिंदखेडा जि.धुळे या संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीचे निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ९ (३) मधील तरतुदीनुसार समितीची मुदत संपण्यापुर्वी एकशेवीस दिवस अगोदर मतदार यादी (नमुना ई-३) देणे बंधनकारक होते तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-अ (१-अ) (ब) मधील तरतुदीनुसार संस्थेच्या व्यवस्थापन समितीने, समितीची कालावधी पुर्ण होण्यापुर्वी निवडणुकीची प्रक्रीया सुरु केली नसल्यामुळे संस्थेवर श्री.~~बी.एन.बडगुजर~~ एन.व्ही.पेंढारकर,बँक तपासणीस, ~~सिंदखेडा~~ चिमठाणे शाखा,धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.धुळे यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणुक करण्यात येत आहे.

सदरचा आदेश आज रोजी दिनांक २२/०५/२०१७ रोजी माझ्या सही शिक्यानिशी पारीत करीत आहे.

(प्रदीप बागुल)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,शिंदखेडा, जि.धुळे

प्रत:-

१श्री.एन.व्ही.पेंढारकर,बँक तपासणीस, चिमठाणे शाखा,धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.धुळे

२/- यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी संस्थेचा पदभार घेवून तसा अहवाल सादर करावा तसचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीचे निवडणुक) नियम २०१४ मधील तरतुदीनुसार कामकाज करून वेळोवेळी अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२. चेअरमन/सचिव, देगांव विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या.देगांव ता.शिंदखेडा जि.धुळे

२/- यांना सुचित करण्यात येते की, आपण उक्त आदेशाची अंमलबजावणी करावी.

३.मुख्य कार्यकारी सहकारी,धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.धुळे

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,शिंदखेडा जि.धुळे